Punjabi

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
पुणे विभागीय मंडळ , पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712 (OFF)

FAX- 020/25536761
Telegram-'SECBOARD' PUNE
E-MAIL sscboardpune@gmail.com

क्र.पुविमं/भांडार/विद्युत/AMC/४७१७
पुणे - ४११००५
दिनांक :-१० .०९.२०२४

प्रति,

\-----------------

\------------------

विषयः- सन २०२४ - २०२५ करिता कार्यालयातील वार्षिक विद्युत देखभालदुरुस्ती करारासाठी दरपत्रके मागविण्याबाबत...

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, कार्यालयाच्या वार्षिक (ए.एम.सी) विद्युत देखभालीकरिता खालील अटी व शर्तीच्या आधीन राहून दरपत्रके सादर करण्यात यावीत.

विद्युत वार्षिक देखभाल दरपत्रक

| अ.क्र. | तपशील | मासिक दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | विद्युत वार्षिक देखभाल | रु. | |

अटी व शर्ती

१. सदर करारनामा एक वर्षाच्या कालावधीसाठी करारबध्द राहील.
२. नियुक्ती करण्यात येणा-या वायरमनचे शासकीय विद्युत देखभाल प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.
३. वायरमनला रोज कार्यालयात सकाळी ९.३० ते ६.३० या वेळेत उपस्थित राहावे लागेल. उपस्थितीबाबत दैनंदिन भांडार शाखेच्या उपस्थिती नोंदवहीत स्वाक्षरी करावी लागेल.
४. वायरमनला शासकीय सुट्टीच्या दिवशी कामाच्या गरजेनुसार उपस्थित राहणे आवश्यक आहे.
५. कोणत्याही प्रकाराचे शॉर्ट सर्किट किंवा इतर दुर्घटना होणार नाही यासाठी नियमित विद्युत देखभाल/तपासणी आपल्यामार्फत करण्यात यावी. मंडळ कार्यालयात इलेक्ट्रीकचे काम करीत असताना

वायरमनला काही ईजा अगर दुर्घटना झाली, तर मंडळ कार्यालय जबाबदार राहणार नाही व तसेच कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

६. आवश्यकतेनुसार विद्युत साहित्य मंडळामार्फत पुरविण्यात येईल व दुरुस्तीच्या कामकाजाकरिता कोणताही स्वतंत्र मेहनताना देण्यात येणार नाही.

७. सर्व अटी व शर्तीस अधीन राहून मासिक देयक अदा करण्यात येईल. सदर देयक प्रत्येक महिन्याच्या ०५ तारखेच्या आत कार्यालयात दोन प्रतीत सादर करावे लागेल. दरमहा वेतनातून २% आयकर कपात करण्यात येईल.आवश्यकते नुसार शासनाच्या इतर कर कपात करण्यात येईल.

८. वायरमनने रोजच्या कामकाजाची दैनंदिनी नोंदवहीत नोंद ठेवावी व शाखाप्रमुख/शाखाधिकारी भांडार यांची स्वाक्षरी घ्यावी.

९. मान्य ठेकेदारास सर्व अटी व शर्तीसह रु.५००/- च्या कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर ०८ दिवसाचे आत करारनामा सादर करावा लागेल.

१०. वायरमनला अनुपस्थित कालावधीत (शासकीय सुटटया वगळून ) मानधन अदा केले जाणार नाही.

११. दरपत्रकासोबत शॉप अॅक्ट व विद्युत ठेकेदाराचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत सादर करण्यात यावी.

१२. दरपत्रकधारकाने आयकर खात्याकडे नोंदणी केल्याबाबतच्या नोंदणी क्रमांकाची छायाप्रत (PAN NO.) सादर करावे.

१३. शॉप अॅक्टनुसार नोंदणी केलेल व्यवसाय करण्याचे प्रमाणपत्र
(संस्था नोंदणी पत्राची सन २०२४-२५ नुतनीकरण केलेली अद्ययावत सत्यप्रत जोडणे.)

१४. पॅन कार्ड व आधार कार्ड आवश्यक आहे.

१५. आवश्यकते नुसार कार्यालयातील फॅन,टयुबलाईट व इतर विद्युत यंत्रणावर धूळ साचल्यास स्वच्छ करावे लागेल.

१६. सदर करार आपणांस कोणतीही सूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार मंडळाने राखून ठेवलेले आहेत.

१७. उपरोक्त प्रमाणे कागदपत्रे जोडुन दरपत्रकाचे सिलबंद पाकिटे दि. १५/०९/२०२४ पर्यंत या कार्यालयास जमा करावे.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५.